14 NOV FRONT PAGE_Layout 1 11/14/2025 7:18 PM Page 1

सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com

१४ नोव्हेंबर २०२५, शुक्रवार | वर्ष १४ वे | अंक १८६ | पृष्ठे ६

लाँड्रीच्या कामासाठी मुले पाहिजेत
संपर्क ८६६८३९८४२१
ठिकाण : स्पिन सिटी लाँड्री शॉप नं.४
नागरे कॉम्प्लेक्स, चिंचोले चौक, बुलढाणा
आकर्षक मानधन देण्यात येईल

# बिहार मध्ये एनडीए'ची डबल सेंच्युरी



**नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर (वृत्तसंस्था) :** बिहार निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. एनडीए २४३ पैकी २०२ जागांसह विक्रमी विजयाकडे वाटचाल करत आहे, तर महाआघाडीला ३४ जागा मिळण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींनी एक्स वर लिहिले आहे की हा सुशासनाचा विजय आहे. २०२० च्या तुलनेत एनडीए ७० पेक्षा जास्त जागा मिळवत आहे, तर महाआघाडी जवळजवळ तितक्याच जागा गमावत आहे. प्रचंड विजयादरम्यान, सम्राट चौधरी आणि ललन सिंह यांनी नितीश कुमार यांची भेट घेतली. गेल्या वेळी ४३ जागांपर्यंत मर्यादित असलेल्या जेडीयूकडे आता ८०+ जागा आहेत. भाजप ९१ जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे.

प्रमुख उमेदवारांमध्ये, तेजस्वी यादव यांनी राघोपूरमध्ये सुमारे १२,००० मतांनी विजय मिळवला. त्यांचे मोठे भाऊ तेज प्रताप यांचा महुआमध्ये पराभव जवळजवळ निश्चित आहे. दोन्ही उपमुख्यमंत्री जिंकण्याची शक्यता आहे. महाआघाडीत, आरजेडीकडे २६ जागा आहेत, तर काँग्रेसला चार जागा मिळण्याची शक्यता आहे. पीके यांचा पक्ष, जन सुराज आणि व्हीआयपी यांना त्यांचे खाते उघडता आले नाही. इतरांसह अपक्ष सहा जागांवर आघाडीवर आहेत.

गेल्या निवडणुकीपेक्षा एनडीएला ६० पेक्षा जास्त जागा मिळाल्या आहेत. २०२० पासून जेडीयूला ४०+ जागा मिळाल्याने त्यांचा सर्वात मोठा फायदा होत असल्याचे दिसून येते. २८ जागांवर निवडणूक लढवणारा लोजपा २१ जागांवर आघाडीवर आहे. सर्व २९ मंत्र्यांमध्ये एनडीए आघाडीवर जेजेडीचे तेजप्रताप महुआमधून पिछाडीवर आहेत रघुनाथपूरमधून आरजेडीचे ओसामा शहाब आघाडीवर आहेत. सरायरंजनमधून जेडीयूचे विजय चौधरी आघाडीवर आहेत. बाहुबली आणि आरजेडीचे उमेदवार रीतलाल यादव दानापूरमधून आघाडीवर आहेत. भोजपुरी अभिनेते आणि आरजेडीचे उमेदवार खेसारी लाल छपरातून पिछाडीवर आहेत. भोजपुरी गायिका आणि भाजपच्या उमेदवार मैथिली ठाकूर अलीनगरमधून आघाडीवर आहेत.

कुशेश्वरस्थान विधानसभा जागेवर जेडीयूचे अतिरेक कुमार विजयी झाले आहेत. गौरभौरम विधानसभा जागेवर भाजपचे सुजित कुमार विजयी झाले आहेत. `अलीनगर विधानसभा जागेवर भाजपच्या मैथिली ठाकूर विजयी झाल्या आहेत. बेनीपूर विधानसभा जागेवर जेडीयूचे विनय कुमार चौधरी विजयी झाले आहेत. बहादुरपूर विधानसभा जागेवर जेडीयूचे मदनी साहनी विजयी झाले आहेत. जले विधानसभा जागेवर भाजपचे जीवेश कुमार विजयी झाले आहेत. दरभंगा शहर विधानसभा जागेवर भाजपचे संजय सरावगी विजयी झाले आहेत. दरभंगा ग्रामीण विधानसभा जागेवर जेडीयूचे ईश्वर मंडल विजयी झाले आहेत. हयाघाट विधानसभा जागेवर भाजपचे रामचंद्र प्रसाद विजयी झाले आहेत. केओटी विधानसभा जागेवर भाजपचे मुरारी मोहन झा विजयी झाले आहेत.

जेडीयूचे उमेदवार एमएलसी श्री भगवान सिंह कुशवाहा यांनी जगदीशपूर विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला आहे. कुशवाहा १७,५६१ मतांनी विजयी झाले. तथापि, निवडणूक आयोगाकडून त्यांच्या विजयाची औपचारिक घोषणा होणे बाकी आहे.

योजनेमध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया
बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
क्रिटीकल केअर व ट्रॉमा सेंटर
पत्ता :- आरास ले आऊट, जांभरूण रोड, बुलडाणा (२४ तास सेवा उपलब्ध)
मो. 7575919191, 7575929292,7575939393, 9730650014
(MJPJAY) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, (PMJAY) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना संलग्नित
संपुर्ण गटातील कुटूंबासाठी संपूर्ण प्रकाराच्या आजारांवरती मोफत व गुणवत्तापुर्ण उपचार व शस्त्रक्रिया इ.
खालील आजारावरील सुविधा संपूर्ण मोफत
१) नवजात बाळाचे आजार (NICU)
२) लहान मुलांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (PICU)
३) मोठ्या मानसांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (मेडिसिन ICU)
४) श्वासाचे आजार / मेंदुचे आजार व शस्त्रक्रिया.
५) किडनिचे आजार व मुतखड्याची शस्त्रक्रिया.
६) पोटाचे आजार व शस्त्रक्रिया तसेच दुर्बिनद्वारे शस्त्रक्रिया (Laproscopy)
७) अस्थिरोग विभाग व शस्त्रक्रिया
८) जळीत रूग्णांचे आजार व शस्त्रक्रीया. (Burn Unit)
९) ट्रॉमा व एक्सीडेंट सर्जरी व उपचार
१०) स्त्रिरोग व प्रसुतीरोग उपचार व शस्त्रक्रिया.
११) कान, नाक, घसा उपचार व शस्त्रक्रीया.
१२) दंतरोगाची सर्जरी व उपचार
१३) प्लास्टीक सर्जरी उपचार
१४) कॅन्सर उपचार, शस्त्रक्रिया व किमोथेरपी इत्यादीची सुविधा
योजनेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे :- १) ओरिजनल राशनकार्ड किंवा २) कुटूंबातील सर्वांचे ओरिजनल आधार्ड कार्ड. ३) आयुष्यमान कार्ड
टिप :- इमर्जसिंमध्ये फक्त रूग्णांच्या आधार कार्डच्या झेरॉक्स वरती सुध्दा रूग्णाला उपचार दिला जाईल.

# जिल्ह्यात काँग्रेस आणि वंचीत एकत्र



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** वंचीत बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांनी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व नगर पालिका एकत्र लढविण्याचा निर्णय घेतला आहे. आज १४ नोव्हेंबर रोजी बुलढाणा येथील पत्रकार भवन बुलढाणा येथे दोन्ही पक्षांच्या वतीने संयुक्तरित्या आयोजित पत्रकार परिषदेत या नव्या समिकरणाची घोषणा केली आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार राहूल बोंद्रे यांनी यांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वंचीत काँग्रेस सोबत आली पाहिजे असा प्रस्ताव वंचीतचे बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे काही दिवसांपूर्वी दिला होता. बाळासाहेबा आंबेडकरांनी याबाबत सकारात्मक भुमिका घेतली होती. सध्या देशात संविधान वाचविण्याची लढाई सुरू आहे. कारण जातीवादी शक्ती या धार्मिक फुट पाडण्याचा प्रयत्न करीत आहे. इंग्रजांपेक्षा ही जास्त प्रभावी पध्दतीने तोडा आणि फोडा अन् राज्य करा असे धोरण सत्ताधारी राबवित आहे. काँग्रेसच्या वाट्याला ज्या जागा येतील त्यामधील जागा वंचीतला दिल्या जाणार आहे. महाविकास आघाडी म्हणून जिल्हाभरात काँग्रेस एकत्र लढणार आहे. काँग्रेसने मित्रपक्षाला देऊळगाव राजा, सिंदखेड राजा, मेहकर या जागा देण्याची शक्यता वर्तवली आहे. तर शहराध्यक्ष त्यांच्या पातळीवर बसवून निर्णय घेतील असे सांगितले. काँग्रेस उद्या किंवा परवा उमेदवारी जाहीर करणार आहे. या आधीच्या निवडणूकांमध्ये वंचीत आणि काँग्रेस वेगवेगळे लढल्यामुळे दोन्ही पक्षांना याचा फटका बसला आहे. त्यामुळे मतविभाजन टाळण्यासाठी व समविचारी पक्ष एकत्र आले पाहिजे ही भुमिका हर्षवर्धन सपकाळ यांनी मांडली आहे. त्यामुळे वंचीतला जिल्ह्यात नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या सन्मानजनक जागा दिल्या जातील. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूका सोबत लढणार असल्याचा विश्वास राहूल बोंद्रे यांनी बोलून दाखविला.

तर वंचीत बहुजन आघाडीच्या सविता मुंढे यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस सोबत वंचीत बहुजन आघाडीने लढले पाहिजे अशी भुमिका कार्यकर्त्यांनी मांडली होती. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेशं काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासोबत याबाबत एका महिन्यांपूर्वी चर्चा केली. पुढील निवडणूकीत ही काँग्रेस सोबत समविचारी पक्ष म्हणून लढणार आहे. यावेळी विधान परिषद आमदार धीरज लिंगाडे, वंचीत बहुजन आघाडीचे राज्याचे प्रतिनिधी साहेबराव तायडे, जिल्हाध्यक्ष निलेश जाधव, देवा हिवराळे, काँग्रेसचे रिजवान सौदागर, काँग्रेसचे शहराध्यक्ष दत्ता काकस, वंचीतचे शहराध्यक्ष मिलिंद वानखडे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# पुरवठा निरीक्षक पूनम थोरात एसीबीच्या जाळ्यात



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** नांदुरा येथील पुरवठा निरिक्षक पुनम थोरात यांना १६ हजारांची लाच स्विकारतांना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ अटक केली आहे. राशनच्या दुकानावरील कारवाई थांबविण्यासाठी नांदुरा तालुक्यातील एका राशन दुकानदारकडे लाचेची मागणी केली होती. त्यानंतर त्यांच्यात काही तडजोड झाली आणि १६ हजार रूपये लाच देण्याचे ठरले. एसीबीच्या पथकाने आज १४ नोव्हेंबर रोजी सापळा रचून पुरवठा निरिक्षक पुनम थोरात यांना १६ हजार रूपयांची लाच घेतांना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ अटक केली आहे. विशेष म्हणजे पुनम थोरात यांना जिल्हा पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट पुरवठा निरिक्षण अधिकारी पूनम थोरात यांना मिळालेल आहे. याप्रकरणाचा पुढील तपास एसीबीचे पथक करीत आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदरची कारवाई एसीबीचे पोलिस उप अधीक्षक चोरमाले यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

# साडे तीन लाखांची फसवणूक करणाऱ्या सायबर भामट्यांना चेन्नईतून अटक



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** सायबर भामट्यांना थेट चेन्नई आणि गुजरात येथुन बुलढाणा सायबर पोलीसांनी अटक केली आहे. दिनांक ७ नोव्हेंबर रोजी मलकापुर येथील फिर्यादी यांनी सायबर पोलीस स्टेशनला तोंडी रिपोर्ट दिला की, काही अज्ञात आरोपींनी फिर्यादी व त्यांचे पत्नीस टेलीग्राम या सोशल मिडीया प्लॅटफॉर्म वर टास्क देवुन त्यामध्ये पैसे कमविण्याची अधिक संधी असल्याच्या भुल थापा देवुन फिर्यादी व त्यांचे पत्नीस सदर टास्क मध्ये अधिका-धिक पैसे गुंतवणुक करुन अधिक नफा मिळविण्याचे आमीष दाखवुन यातील फिर्यादी यांची एकुण ३ लाख ६४ हजार ५०० रुपयांची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली. फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन सायबर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर क्लिष्ट प्रकारच्या गुन्हयाचा तपास पोलीस अधिक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधिक्षक अशोक गायकवाड यांचे मार्गदर्शनाने सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांचे आदेशाने सायबर पोलीस स्टेशनचे एपीआय प्रमोद इंगळे, एएसआय शकील खान, राजदीप वानखडे, विक्की खरात, पंढरी सातपुते यांचे पथकाने गुन्हयाशी संबधीत सर्व बँक डिटेल्स, मोबाईल नंबर यांची पडताळणी करुन सदर प्रकरणात फसवणुक करण्या करीता फ्रॉडस्टरला स्वताचे व ईतरांचे अकाउंट पुरवणारा आरोपी मंगुकीया चिरागभाई सावजीभाई वय २७ वर्षे, रा. सुरत गुजरात याचा सुरत येथे शोध घेतला असता, सदर आरोपी हा चेन्नई सेंन्ट्रल जेल मध्ये असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर आरोपीस बुलढाणा सायबर पोलीसांनी चेन्नई येथुन ताब्यात घेवुन आरोपीचा पीसीआर घेवुन पुढील आरोपी कांझीभाई मगणभाई चौटाला वय २८ वर्षे, रा. सुरत यांस अटक करुन ताब्यात घेतले सदर आरोपीची वि. कोर्ट मलकापुर येथे पेशी करुन सायबर पोलीस सदर आरोपीस विचारपुस करुन गुन्हयाचा पुढील तपास करीत आहेत. अशा प्रकारच्या क्लिष्ट प्रकाच्या गुन्हयांमध्ये सायबर पोलीसांकडुन अज्ञात आरोपींच्या वारंवार मुसक्या आवळल्या जात आहेत. ज्यामुळे जनसामान्यांकडून बुलढाणा सायबर पोलीसांचे कौतुक होत आहे. सध्या ट्रेन्ड मध्ये असलेल्या डिजीटल अरेस्ट, टास्क फ्रॉड, शेयर मार्केट ट्रेडींग चे नावावर लोकांना भुर्दंड घालणाऱ्या सोशल मिडीया प्लॅटफॉर्म पासून सावध रादण्याचे आव्हाण सायबर पोलीसांकडून करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे जनसामान्याबरोबर सायबर फ्रॉड झाल्यास आपली तक्रार तात्काळ NCCRP पोर्टलवर (१९३०) नोंदवावी.




बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा... किंमत १ रू.

## थोडक्यात

### ट्रॅक्टरची चोरी; दोघांना अटक

**खामगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** खामगाव-अकोला रोडवरील एका दुकानासमोरून ३० मे रोजी चोरीला गेलेल्या ट्रॅक्टर प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील तपासादरम्यान पोलिसांनी भूषण श्रीकृष्ण ठाकरे (वय २४, रा. अनकवाडी, ता. अकोला) आणि वैभव उर्फ 'छकुला' बाबुजी आठवले (वय २७, रा. कपिलेश्वर, ता. अकोला) या दोघांना ११ नोव्हेंबर रोजी अटक केली. आरोपींकडून एमएच २८ एझेड ९१८७ क्रमांकाचा २ लाख २५ हजार किमतीचा ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी या चोरीचा छडा लावून गुन्हा उकल केला.

### शेतातील कृषी साहित्य चोरी गुन्हा दाखल




**खामगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील शेंद्री शेत शिवारातील शेतातून १० नोव्हेंबर रोजी रात्री १५ हजार रुपयांचे कृषी साहित्य चोरीची घटना घडली. फिर्यादी प्रकाश गुलाबसिंग पवार (५४) रा. संभापूर, ता. खामगाव यांनी त्यांच्या शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी ११ स्प्रिंकलर पाईप ठेवले होते.

रात्रीच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने सर्व साहित्य लंपास केले. चोरीला गेलेल्या मालाची एकूण किंमत १५,७०० आहे, ज्यात ११ स्प्रिंकलर पाईप ( अंदाजे ७,७०० रुपये) आणि ८ तोट्यांचा (अंदाजे ८,०००) समावेश आहेत. फिर्यादीने तातडीने पोलिस स्टेशनला तक्रार केली, आणि त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### खराब रस्त्यांमुळे एसटी बस बंद

**डोणगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शेलगाव देशमुख-कनका- बेलगाव-डोणगाव या मार्गावर दररोज विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असते. मात्र, शेलगाव देशमुख रस्त्यावरील खोल खड्ड्यांमुळे बुधवारी परत येणारी एसटी बस समृद्धी महामार्गाच्या पुलाजवळच बंद पडली. याच बसने बेलगावकडील विद्यार्थ्यांना घेण्यासाठी डोणगाव बसस्थानकात परत यायचे होते.

बस वेळेवर न आल्याने विद्यार्थी तब्बल दोन तास बसस्थानकावर उभे राहून प्रतीक्षा करत राहिले. शेलगाव देशमुख-कनका मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी आहे. पालकांच्या मते, या खराब रस्त्यावर वारंवार बस बंद पडत असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय तर होतेच, परंतु बस बिघडल्यास चालकावर एसटी महामंडळाकडून दंडात्मक कारवाई केली जाते. त्यामुळे रस्ता दुरुस्त नसताना चालकांना जबाबदार धरणे अन्यायकारक असल्याचे पालकांचे मत आहे. ही समस्या न सोडविल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे पूर्वप्रमाणन आवश्यक : डॉ.किरण पाटील

**राज्य निवडणूक आयोगाचे आदेश जारी**

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यातील नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरूवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या माध्यमातून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासन राजपत्राद्वारे आदेश जारी केले आहे.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत उपविभगीय अधिकारी, बुलढाणा, अपर पोलीस अधीक्षक, बुलढाणा, मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे जिल्हा प्रतिनिधी हे सदस्य, तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत.

९ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, बल्क एसएमएस, व्हाईस एसएमएस), संकेतस्थळे आदींचा समावेश होतो. मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करावयाच्या जाहीरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु अशा माध्यमातून जाहिराती प्रसिद्ध करतांना आचारसंहिता किंवा संबंधित कायद्याचे उल्लंघन होता कामा नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. प्रस्तावित जाहिरात प्रसारित/प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करावा लागेल. प्रस्तावित जाहिरात संपूर्ण राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी असल्यास किंवा १० पेक्षा अधिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करावा लागेल. पूर्व प्रमाणनाच्या अर्जासमवेत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती जोडणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

### 'या' जाहिरातींचे पूर्वप्रमाणन केले जाणार नाही

महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार विशिष्ट स्वरूपाच्या आशयाचा समावेश असलेल्या जाहिराती प्रसारित / प्रसिद्ध करता येणार नाहीत व अशा स्वरुपाच्या जाहिरातीचे पूर्वप्रमाणनही केले जाणार नाही. त्यानुसार (क) भारतीय संविधानाची पायमल्ली, केंद्र/ राज्य शासनाच्या कायद्याचे उल्लंघन, (ख) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांची पायमल्ली, (ग) धर्म, वंश, जात, लिंग, भाषा, पेहराव इत्यादीच्या आधारे तेढ अथवा शत्रुत्वाची शक्यता, (घ) प्रार्थना स्थळांचे छायाचित्र / छायाचित्रणाचा समावेश, (ङ) कायदा व सुव्यवस्थेला आव्हान, हिंसेला प्रोत्साहन, शांततेचा भंग, (च) न्यायालयाचा अथवा एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची बदनामी, (छ) देशाच्या ऐक्याला, सार्वभौमत्वाला आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा, (ज) अन्य कुठल्याही देशावर टिका, अवमानजनक टिप्पणी अथवा तिरस्कारपूर्ण विधान, (झ) संरक्षण दलाच्या अधिकारी / कर्मचारी अथवा संरक्षण दलाचे छायाचित्र/ छायाचित्रण, (ञ) राजकीय पक्ष, राजकीय नेता किंवा अन्य कोणावरही खोटे आरोप, (ट) कुठल्याही राजकीय नेत्याच्या अथवा व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात हस्तक्षेप,(ठ) नीतिमत्ता व सभ्यतेचे उल्लंघन,(ड) अश्लिलतेला प्रोत्साहन अशा स्वरुपाच्या जाहिराती प्रसारित / प्रसिद्ध करता येणार नाहीत व पूर्वप्रमाणन केले जाणार नाही.

### 'एलसीबी' कडून अंढेरा पोलिसांचे पितळ उघडे

**देऊळगाव राज, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** ग्रामीण भागातील सर्वात मोठे पोलीस स्टेशन म्हणून ओळखल्या जाणारे अंढेरा पोलीस स्टेशन गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत असून याठिकाणची पोलिसिंग संपत चाचली असल्याची चर्चा वारंवार होत आहे. सततच्या गुन्हेगारी कारवाया, चोऱ्यांचा वाढता आलेख आणि बुलढाणा येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत असलेल्या कारवाया पाहता स्थानिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न चिन्ह उभे राहीले आहे. गेल्या काही दिवसांपासून डिग्रस, नारायण खेड, इसरूळ, चिंचखेड या ठिकाणांवरुन मोठ्या प्रमाणात रेती चोरी सुरु आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन विविध पथकांनी वेगवेगळ्या ठिकाणी नाकाबंदी करुन अवैध रुपयांचा रेती वाहतुक करणाऱ्या दोन टिप्परवर कारवाया केल्या. यामध्ये एक टिप्पर १२ नोव्हेंबरच्या रात्री डिग्रस शिवारात तर दुसरे टिप्पर कोनड बुद्रूक शिवारात १३ नोव्हेंबरच्या पहाटे पकडण्यात आले. या दोन्ही कारवायांमध्ये एकुन ६६ लाख मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### पंडित जवाहरलाल नेहरू यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ, नायब तहसीलदार प्रमोद करे, तहसीलदार विजय सवडे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर व उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## परवानाधारकाकडील शस्त्रे पोलीस स्टेशनमध्ये जमा करा : जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील परवानाधारकाकडे असलेले शस्त्रे जमा करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना छाननी समितीने जाहिर केले आहे. त्याअनुषंगाने मार्गदर्शक सूचनाचे पालन करुन परवानाधारक व्यक्तींनी आपली शस्त्रे त्वरीत पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्याचे निर्देश जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमीत केले आहेत.

छाननी समितीने जाहिर केलेले मार्गदर्शक सूचना : बँक, संस्था,सोनार,देवस्थान आणि पेट्रोलपंप धारक यांचेकडे असलेले शस्त्रपरवाने निवडणूक कालावधीत जमा करण्याची

### शस्त्रे जमा करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना

आवश्यकता नसल्याचे समितीने निर्णय घेतला आहे. नगरपालीका/नगरपरीषद क्षेत्रातील शस्त्र-परवानाधारक यांचेकडून शस्त्रे जमा करावी. याव्यतिरिक्त निवडणूकीच्या कालावधीमध्ये शस्त्र जमा करण्यापासून सुट देण्याबाबत शस्त्र परवानाधारक यांचेकडून विनंती अर्ज प्राप्त झाल्यास पोलीस विभागाने शस्त्र परवानाधारक यांना सूट देण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ? याबाबत सखोल पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज निर्णयार्थ छाननी समिती समोर सादर केल्या जाईल.

जे शस्त्र परवानाधारक गंभीर स्वरुपाचे गुन्ह्यात(भारतीय दंड संहिता मधील सर्व प्रकारचे गुन्हे) इत्यादी गुन्ह्यात अडकलेले आहेत व त्यांना जामीनावर सुटका मिळालेली आहे अशा परवाना धारकांकडून कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही यासाठी त्यांच्याकडील शस्त्र तात्काळ जमा करावी. ज्या शस्त्र परवाना धारकांना अपराधाची पार्श्वभूमी आहे. तसेच कोणत्याही निवडणूकी दरम्यान घडलेल्या दंगलीमध्ये कायदा व सुव्यवस्था भंग करण्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या शस्त्र परवानाधारकाचे देखील शस्त्रे पोलीस विभागाकडून जमा करण्यात यावे.

## माहेरहून १० लाख रुपये आणण्यासाठी विवाहितेचा शारीरिक, मानसिक छळ; गुन्हा दाखल

**खामगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** माहेरहून १० लाख रुपये आणण्याचा तगादा लावत सासरच्या मंडळींनी छळ केल्याप्रकरणी विवाहितेच्या तक्रारीवरून ११ नोव्हेंबर रोजी सासरच्या सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



स्थानिक शेगाव नाका भागातील स्वाती संदीप पवार (३७) या विवाहितेने खामगाव शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, सासरच्या मंडळींनी पैशांची मागणी करीत तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. या तक्रारीवरून, पती संदीप वसंतसिंग पवार (५०), सासू कोकिला वसंतसिंग पवार (७०), जेठ महेंद्र वसंतसिंग पवार (५२), जेठाणी मोसमी महेंद्र पवार (५१), नंदोई जयरामसिंग तुबसिरामसिंग परदेशी (५५) आणि सरिता जयराम परदेशी (५४) सर्व रा. संतोषी अपार्टमेंट, फ्लॅट नं. २०४, फास्ट रेल्वे ट्रॅक समोर, मुंद्रा, ठाणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठीत

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे.

या समितीमध्ये जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील हे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहणार आहेत. तसेच बुलढाणाचे उपविभागीय अधिकारी, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, दैनिक दिव्य मराठीचे जिल्हा प्रतिनिधी लक्ष्मीकांत बगाडे, साम टिव्हीचे जिल्हा प्रतिनिधी संजय जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेश प्रतिनिधी गणेश निकम, डिजीटल मिडीया परिषदेचे अध्यक्ष गणेश सोळंकी हे या समितीचे सदस्य म्हणून कार्यरत राहणार आहेत. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड हे या समितीचे सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहणार आहेत.

## ४ दिवसानंतर नगर पालिका निवडणुकीच्या ३ अर्ज दाखल

**देऊळगांव राजा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यातील ११ नगर परिषदच्या निवडणुकीची रणधुमाळी सोमवारपासून १० नोव्हेंबर रोजी सुरू झाली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक कार्यालयात निवडणूक विभागाकडून विविध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. जिल्ह्यातील देऊळगांव राजा नगर परिषदच्या निवडणुकीचा नामनिर्देशनचा पाचव्या दिवशी नगर पालिकेत पत्रकार अशरफ पटेल यांनी नगर पालिका निवडणुकीचा पहिला अर्ज सादर केला. गेल्या चार दिवसात निवडणुकीचे अर्ज दाखल झाले नव्हते तसेच अर्ज दाखल करण्यासाठी १७ नोव्हेंबरची अंतिम मुदत आहे.



रविवारची सुट्टी वगळता अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ ३ दिवसांचा अवधी शिल्लक आहे. येणाऱ्या तीन दिवसात अर्ज दाखल करण्याची गर्दी होण्याची शक्यता आहे तर ऐन वेळेवर नगरपालिकेचेवतीने सूचक यांनाही उमेदवारासोबत घर टॅक्स करण्याचे नवीन आदेश वेळेवर काढल्याने उमेदवारांसमोर नवीन समस्या आल्याने उमेदवारांची धावपळ ऐन वेळेवर सुरू झाली. या सर्व कागद पत्राची वेळेवर पूर्ण करून पत्रकार अशरफ पटेल यांनी अर्ज सादर केला. शेवटच्या शनि दोन आले.

## कारमध्ये कोंबून १४ बकऱ्या चोरल्या; गुन्हा दाखल

**घटना सीसी कॅमेऱ्यात कैद**



**नांदुरा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** नांदुरा तालुक्यातील विटाळी (धानोरा) येथील शेतकऱ्याच्या नऊ बकऱ्या व पाच बोकड चोरट्यांनी चक्क बलेनो कारमध्ये कोंबून चोरून नेल्या. १० नोव्हेंबरच्या मध्यरात्री ही घटना घडली.

विटाळी येथील समाधान निंबाजी बोदवडे यांनी शेतीला पूरक म्हणून शेळीपालन व्यवसाय सुरू केला आहे.

त्यांच्याकडे एकूण १७ बकऱ्या होत्या. त्यापैकी घरासमोरील गोठ्यातील नऊ बकऱ्या (किंमत ९० हजार) व पाच बोकड (किंमत ६० हजार) चोरट्यांनी

चोरून नेल्या. ग्रामपंचायतीच्या वतीने गावात बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये चोरीचे दृश्य कैद झाले आहे. त्यामध्ये ११ नोव्हेंबरच्या पहाटे दोन वाजून तीन मिनिटांनी बलेनो गाडीत बकऱ्या घेऊन गेल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्याच्या तक्रारीवरून मलकापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सहाय्यक फौजदार उल्हास मुके करीत करीत आहेत. कारमध्ये बकऱ्या चोरून नेल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी तातडीने तपास वाढवावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# समाजहृदयी उद्योजक अमोल हिरोळे यांच्या वाढदिवसाला दिग्गजांची हजेरी !



राज्याचे कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर व बुलडाणा अर्बनचे संस्थापक राधेश्याम चांडक



अमोल हिरोळे यांचे फुंडकर कुटूंबियांशी जुने स्नेहबंध आहेत. वाढदिवसाला आकाशदादांची हजेरी या संबंधांना अधोरेखीत करणारी होती.



बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड.



जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी सपत्नीक उपस्थित.

गुड इव्हिनिंग City



माजी मंत्री ना. डॉ. राजेंद्र शिंगणे यांची पूर्णवेळ उपस्थिती



जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांनीही श्री हिरोळे यांना शुभेच्छा दिल्या.



क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर



माजी आमदार धृपदराव सावळे



सम्राट संघटनेचे आशिषबाबा खरात.



प्रख्यात डॉक्टर दिपक लध्दड व डॉ.संगिता लध्दड

## रक्ताने रेखाटलेल्या चित्राने हिरोळेंना प्रेमवंदना



**बुलढाणा, ११ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** उद्यजक तथा समाजिक नेते अमोल हिरोळे यांच्या प्रती महामानव गृपने अपार प्रेम व्यक्त केले आहे. महामानव गृपचे सुमित गायकवाड यांनी अमोल हिरोळे यांचे रक्ताने चित्र रेखाटून वाढदिवसाच्या दिवशी अनोखी भेट दिली आहे. सुमित गायकवाड यांनी अमोल हिरोळे यांच्या कार्याचा त्यांनी नेहमीच आदर्श घेतला आहे.



स्नेह भोजन करतांना जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर, उद्योजक राजेश देशलहरा, विधीज्ञ ॲड. जितेंद्र कोठारी.



मुंबई हायकोर्टाचे रजीस्ट्रार अरविंद वानखेडे.

# जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठीत

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील हे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहणार आहेत. तसेच बुलढाणाचे उपविभागीय अधिकारी, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, दैनिक दिव्य मराठीचे जिल्हा प्रतिनिधी लक्ष्मीकांत बगाडे, साम टिव्हीचे जिल्हा प्रतिनिधी संजय जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेश प्रतिनिधी गणेश निकम, डिजीटल मिडीया परिषदेचे अध्यक्ष गणेश सोळंकी हे या समितीचे सदस्य म्हणून कार्यरत राहणार आहेत. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड हे या समितीचे सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहणार आहेत.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या


## 16 वर्षांखालील मुलांचे फेसबुक, इंस्टाग्राम अकाउंट होणार डिलीट

ऑस्ट्रेलियामध्ये सोशल मीडिया वापरकर्त्यांसाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. १० डिसेंबरपासून १६ वर्षांखालील मुले फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि टिकटॉक सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करू शकणार नाहीत. हा निर्णय देशातील नवीन ऑनलाइन सुरक्षा नियमांतर्गत आहे. तथापि, १६ वर्षांखालील मुले पालकांच्या संमतीनेच सोशल मीडिया वापरू शकतात. ऑनलाइन धोक्यांपासून मुलांना वाचवण्यासाठी बनवलेला हा जगातील पहिलाच कायदा आहे. या नियमाचे पालन न करणाऱ्या कंपन्यांना ४९.५ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्स (अंदाजे २७० कोटी रुपये) दंड होऊ शकतो. सोशल मीडियामुळे होणाऱ्या नुकसानीपासून मुलांना वाचवणे हा यामागचा उद्देश आहे. ज्या मुलांना अकाउंट्स बंद होणार आहेत त्यांना हा प्लॅटफॉर्म प्रथम संदेश पाठवेल.

# मुलांना फोन, टॅबलेट देण्यापूर्वी 5 सेटिंग्ज बदला...

### जेणेकरून त्यांचे डोळे कमकुवत होऊ नयेत!





**आजकाल, प्रत्येक घरातील लहान मुले मोबाइल फोन आणि टॅब्लेटवर कार्टून, गेम आणि व्हिडिओ पाहतात. यामुळे त्यांच्या पालकांनाही काही दिलासा मिळतो, कारण मुले मोबाइल फोन पाहताना शांत राहतात. तथापि, दीर्घकाळ स्क्रीनवर राहिल्याने मुलांचे डोळे कमकुवत होऊ शकतात. जर तुम्ही या बालदिनी तुमच्या मुलांना मोबाइल फोन किंवा टॅबलेट भेट दिला असेल तर त्यांच्या डोळ्यांवर नकारात्मक परिणाम होऊ नये म्हणून काही सेटिंग्ज बदलण्याचा विचार करा. काही सेटिंग्ज बदलून तुम्ही तुमच्या मुलांना पुढील नुकसानीपासून वाचवू शकता. अशा पाच सेटिंग्जबद्दल जाणून घेऊया...**

- डार्क मोड चालू करा : फोन आणि टॅब्लेटमधील प्रकाश डोळ्यांना नुकसान पोहोचवण्याचे एक प्रमुख कारण आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही डार्क मोड चालू करू शकता. डार्क मोड डोळ्यांचा ताण कमी करण्यास मदत करू शकतो, विशेषतः कमी प्रकाशात किंवा रात्री वापरल्यास. म्हणून, तुम्ही डार्क मोड चालू करू शकता. ते चालू करण्यासाठी, सेटिंग्ज वर जा, नंतर डिस्प्ले आणि ब्राइटनेस वर जा. येथे, तुम्हाला डार्क मोड पर्याय दिसेल, जो तुम्ही चालू करू शकता.
- ऑटो ब्राइटनेस चालू करा : स्क्रीन खूप तेजस्वी असल्यास डोळे लवकर थकतात. खूप कमी प्रकाशदेखील हानिकारक आहे. म्हणून, ऑटो ब्राइटनेस चालू करा. फोन खोलीच्या ब्राइटनेसवर आधारित स्क्रीन ब्राइटनेस स्वयंचलितपणे समायोजित करेल. मुले जिथे जिथे त्यांचा मोबाइल किंवा टॅबलेट पाहतात तिथे त्यांच्या डोळ्यांना पुरेसा प्रकाश मिळेल. ही सेटिंग प्रत्येक फोनवर सहज उपलब्ध आहे. ब्राइटनेस सेटिंग ऑटो वर सेट करण्यासाठी, वरचा बार ड्रॅग करा आणि ऑटो निवडा.
- फॉन्ट आणि आयकॉन मोठे करा : लहान अक्षरे आणि बटणे पाहताना मुले डोळे मिचकावतात. यामुळे डोळ्यांवर ताण येतो. तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा आणि फॉन्ट आकार आणि डिस्प्ले आकार वाढवा. मोठ्या प्रतिमा मुलांना दूरवरून पाहणे सोपे करतील. डोळे कमी थकतील. सेटिंग्जमध्ये डिस्प्ले आणि सेटिंग्ज वर जा आणि फॉन्ट आणि डिस्प्ले आकार निवडा. येथे, तुम्ही फॉन्ट आणि डिस्प्ले आकार वाढवू शकता.
- स्क्रीन वेळ मर्यादा सेट करा : फोनमध्ये Digital Wellbeing आणि Parental Control पर्याय आहे. तुमचे मूल दररोज किती वेळ फोन वापरू शकते यावर तुम्ही मर्यादा सेट करू शकता. एकदा वेळ मर्यादा पूर्ण झाली की, फोन आपोआप लॉक होईल. हे तुमच्या मुलाला जास्त काळ स्क्रीनकडे पाहण्यापासून रोखेल. सेटिंग्जमध्ये जा, Digital Wellbeing किंवा Parental Control निवडा आणि स्क्रीन रिमाइंडर सेट करा. वेळ संपल्यावर हे रिमाइंडर पाठवेल आणि तुम्हाला तुमचा फोन बंद करण्याची सूचना मिळेल.
- ऑटो-लॉक चालू करा : ऑटो-लॉक चालू करा. तुमचा फोन ३० सेकंद किंवा १ मिनिटानंतर आपोआप लॉक होऊ द्या. मुले खेळताना अनेकदा त्यांच्या फोनकडे पाहत राहतात. स्क्रीन लवकर बंद झाल्याने त्यांच्या डोळ्यांना मध्ये मध्ये विश्रांती मिळेल. हे करण्यासाठी, सेटिंग्जमध्ये जा, नंतर डिस्प्लेवर जा आणि ऑटो लॉक/स्क्रीन टाइमआउट अंतर्गत वेळ कमी करा.

# एअर प्युरिफायरमध्ये काय असते CADR रेटिंग?

## तुम्ही तपासले नाही, तर पैसे खर्च करूनही स्वच्छ होणार नाही हवा

**शहरांमधील हवा अधिकाधिक प्रदूषित होत आहे. हानिकारक वायू लोकांना आजारी बनवत आहेत. कारचा धूर, कारखान्यातील वायू आणि बांधकामातील धूळ हवेला विषारी बनवत आहेत. बाहेर श्वास घेणे कठीण होते. घराच्या खिडक्या उघडल्यानेही प्रदूषित हवा येते. अशा परिस्थितीत एअर प्युरिफायर हा एक चांगला पर्याय आहे. हे मशीन खोलीतील हवा स्वच्छ करते. धूळ, धूर आणि लहान जंतू काढून टाकते. पण प्रत्येक प्युरिफायर सारखा नसतो. एअर प्युरिफायर खरेदी करताना, CADR रेटिंग नावाचा विशिष्ट क्रमांक शोधणे महत्त्वाचे आहे. एअर प्युरिफायर खरेदी करताना CADR रेटिंग जाणून घेणे का महत्त्वाचे आहे ते समजून घेऊया...**

- CADR रेटिंग काय दर्शवते? : CADR म्हणजे Clean Air Delivery Rate. सोप्या भाषेत सांगायचे तर, ते प्युरिफायर एका मिनिटात किती स्वच्छ हवा देऊ शकते हे दर्शवते. ही संख्या CFM मध्ये सांगितली जाते. CFM म्हणजे प्रति मिनिट घनफूट. ही संख्या जितकी जास्त असेल तितक्या लवकर हवा स्वच्छ होईल. उदाहरणार्थ, जर CADR 300 असेल तर तुम्हाला एका मिनिटात 300 घनफूट स्वच्छ हवा मिळेल.
- तीन प्रकारचे CADR का आवश्यक? : पहिला CADR धुरासाठी आहे. तो सिगारेटचा धूर किंवा बाहेरील वायू साफ करतो. दुसरा धूळसाठी आहे. तो घरात तरंगणारी धूळ आणि लहान कण काढून टाकतो. तिसरा फुलं आणि झाडांपासून निर्माण होणाऱ्या ॲलर्जींशी संबंधित आहे. चांगल्या मशीनमध्ये, तिन्ही संख्या अंदाजे समान असाव्यात. जर एक कमी असेल तर घाण काढली जाणार नाही. पॅकेजिंगवरील तिन्ही संख्या तपासा.
- खोलीच्या अनुसार CADR निवडा : प्युरिफायर खरेदी करण्यापूर्वी, खोलीचा आकार विचारात घ्या. लांबी, रुंदी आणि उंची मोजा. खोलीचा पूर्ण आकार घनफूटमध्ये मिळविण्यासाठी या तीन संख्यांचा गुणाकार करा. आता, खोलीच्या



आकाराच्या दोन-तृतीयांश CADR निवडा. उदाहरणार्थ, १० फूट उंचीची २०० चौरस फूट खोली २००० घनफूट आहे. १३० ते १५० CFM चा CADR पुरेसा आहे. यामुळे तासाला चार ते पाच वेळा हवा स्वच्छ होईल.
- कमी CADR मध्ये काय समस्या आहे? : जर खोली मोठी असेल आणि CADR कमी असेल, तर मशीन रात्रभर चालेल. हवा अजूनही पूर्णपणे स्वच्छ राहणार नाही. ती जास्त वीज वापरेल आणि जास्त आवाज येईल. श्वास घेण्यास त्रास होत राहील. पैसे खर्च होतील पण कोणताही फायदा होणार नाही. म्हणून, CADR ला कधीही दुर्लक्ष करू नका.
- CADR ची चाचणी कशी केली जाते? : कोणतीही कंपनी स्वतःचे CADR रेटिंग तयार करत नाही. AHAM नावाच्या अमेरिकन संस्थेद्वारे त्याची चाचणी केली जाते. ते बंद खोलीत धूर, धूळ आणि इतर कण ठेवतात. मग, ते प्युरिफायर चालवतात. हवा किती लवकर स्वच्छ होते हे ते पाहतात. ही चाचणी अचूकपणे केली जाते. भारतातील अनेक कंपन्या AHAM कडून प्रमाणपत्र देखील मिळवतात. मशीनवर AHAM चिन्ह पहा. प्रमाणपत्राशिवाय रेटिंगवर विश्वास ठेवू नका.

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
१४ नोव्हेंबर २०२५, शुक्रवार

## बुलडाणा सायबर पोलीसांची मोठी कामगिरी

# 'डिजिटल अरेस्ट' फसवणुकीत ९.९४ लाख परत



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** सायबर गुन्ह्यातील अत्यंत गंभीर समजल्या जाणाऱ्या डिजीटल अरेस्ट स्वरूपातील फसवणूक प्रकरणात बुलडाणा सायबर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने मोठी कामगिरी बजावली आहे. तक्रारदार विनोदकुमार उत्तमराव साळोक (वय ४२) आणि त्यांची पत्नी यांना खोट्या सीबीआय व ट्राई विभागाच्या नावाने धमकी देत त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे खोटे आरोप लावून १० लाख रुपये ऑनलाईन भरावयास लावून फसवणूक करण्यात आली होती.

तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, २० ते २४ ऑगस्ट या कालावधीत अज्ञात व्यक्तींनी व्हॉट्सअॅप कॉलद्वारे डिजीटल अरेस्टची भीती दाखवून एक्सीस बँक मधील ग्लोबल टिंबर्स नावाच्या खात्यात आरटीजीएसद्वारे १० लाख रुपये जमा करण्यास भाग पाडले. यावरून २५ ऑगस्ट रोजी सायबर पोलीस स्टेशन, बुलडाणा येथे गुन्हा नोंदविण्यात आला.

तक्रार प्राप्त होताच पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांनी तातडीने संबंधित बँकांना पत्रव्यवहार करून आरोपींच्या खात्यांची तांत्रिक तपासणी सुरू केली. फसवणूक केलेले पैसे विविध खात्यांत वळविण्यात आले असल्याचे समोर आले. तपास पथकाने त्वरित ही सर्व खाती गोठविण्याची प्रक्रिया केली. तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपींनी वळवलेली तक्रारदारांची रक्कम मिझोरम राज्यातील एका बँक खात्यात गेल्याचे निदर्शनास आले. तत्काळ कारवाई करत त्या खात्यातील तब्बल ९ लाख ९४ हजार ३०० रुपये रक्कम गोठवून न्यायालयाच्या आदेशानुसार ती तक्रारदारांच्या बँक खात्यात १२ नोव्हेंबर रोजी यशस्वीरित्या परत मिळवून देण्यात आली. ही कामगिरी पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रकाश सदगर, तपास अधिकारी पो. नि. संग्राम पाटील, सपोनि प्रमोद इंगळे, पोहेकॉ रामेश्वर मुंढे, प्रशांत गावंडे, राहुल इंगळे आणि केशव पुढे यांच्या पथकाने केली.

### जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांचे नागरिकांना आवाहन

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी आवाहन केले की, डिजीटल अरेस्ट असा स्वरुपाचा कोणताही प्रकार नसतो. पोलीस किंवा कोणतेही डिपार्टमेंट व्हॉट्सअॅपव्दारे कॉल किंवा व्हिडीओ कॉल करुन आपणास अटक करत नाही. त्यामुळे अनोळखी नंबरवरुन येणारे व्हॉट्सअॅप कॉल किंवा व्हिडीओ कॉल आल्यास नागरिकांनी त्यास प्रतिसाद देवू नये. तसेच ऑनलाईन आर्थिक फसवणुक झाल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाइन क्रमांक १९३० किंवा १९४५ या क्रमांकावर किंवा cybercrime.gov.in या वेबसाईटवर तक्रार नोंदवावी. तसेच शक्य असल्यास तात्काळ नजीकचे पोलीस स्टेशन अथवा सायबर पोलीस स्टेशन, बुलढाणा येथे संपर्क साधावा.

# खामगाव नगर परिषदेने केलेल्या करवाढीचा पुनर्विचार व्हावा : गणेश चौकसे

**खामगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी)** खामगाव नगर परिषदेने संन २०२५-२६ वर्षाकरिता प्रस्तावित वार्षिक कर मूल्यांकनात प्रचंड प्रमाणात वाढ केलेली असून त्या करवाढीचा पुनर्विचार व्हावा अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या निवेदनात नमूद आहे की, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात नगरपरिषद प्रशासनाने सन २०२५- २६ करीता प्रस्तावित वार्षिक कर मूल्यांकनात प्रचंड प्रमाणात वाढ केलेली आहे. वास्तविक पाहता खामगाव नगरपरिषद ही महानगरपालिका नसून नगरपालिका आहे. परंतु करवाढ ही महानगरपालिकेलाही लाजवेल अशा प्रचंड प्रमाणात करण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. विशेष म्हणजे शहराला पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा नियमित होत नसताना सुद्धा त्यांचा वार्षिक कर १२०० रुपयावरून १८०० रुपये एवढा करण्यात आलेला आहे.तसेच शहरात रस्ते, नाल्या, दिवाबत्ती, साफसफाई यासारख्या मूलभूत सोयी सुविधांचा अभाव आहे. नियमाप्रमाणे पाच वर्षात २० टक्के करवाढीचा अधिकार नगरपरिषदेला आहे तसे न करता ३०० टक्के करवाढ करून हुकूमशाही पद्धतीने शहरातील नागरिकांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. खामगाव शहराच्या जवळ असलेल्या शेगाव शहरांमध्ये कोणत्याही प्रकारची वाढीव वार्षिक कर मूल्यांकन करण्यात आलेली नाही. तरी वरील प्रकरणाची योग्य ती दखल घेण्यात येऊन ही करवाढ नागरिकांवर अन्यायकारक असल्यामुळे या करवाढीचा पुनर्विचार करावा असेही निवेदनात नमूद केले आहे. सादर निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, पालकमंत्री, विरोधी पक्षनेता, जिल्हाधिकारी, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांना पाठविण्यात आलेल्या आहेत.

नागरिकांनी हरकत अर्ज विनामूल्य घेऊन जावा - खामगाव नगर परिषदेने प्रस्तावित वार्षिक कर मूल्यांकनात प्रचंड प्रमाणात वाढ केलेली आहे.कर वाढीची नोटीस शहरातील काही प्रभागांमधील नागरिकांना देण्यात आलेल्या आहेत. नोटीस प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत करवाढीबद्दल हरकत घेऊं शकता असा नोटीस मध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे.तसे न केल्यास वाढीव कर आपल्याला मान्य आहे असे गृहीत धरता येईल. त्याकरिता ज्यांना वाढीव कराची नोटीस प्राप्त झालेली आहे त्यांनी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या आठवडी बाजार येथील कार्यालयात हरकत अर्ज विनामूल्य घेऊन जावा व तो अर्ज नगरपरिषदेमधील आवक, जावक विभागात सादर करून तो अर्ज सादर केल्याची पोच घ्यावी.



**- गणेश चौकसे,**
**जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी महासंघ**

# नगरपरिषद निवडूक पदासाठी ५ दिवसात २ अर्ज दाखल; खामगांव नगर पालीकामध्ये उर्वरित दिवसांत होणार गर्दी

**खामगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला गेल्या सोमवारपासून सुरुवात होऊन आज ५ दिवस उलटल्यावर काल एक अर्ज नगराध्यक्ष पदासाठी इंडियन मुस्लिम लीग यातर्फे पठाण शिरीन पठाण वसीम यांच्या वतीने दाखल करण्यात आला तर आज एक सदस्य पदासाठी प्रवीण सुदाम जोगदंड यांनी अर्ज केले.

इच्छुकांमध्ये अद्याप अर्ज दाखल करण्याचा उत्साह दिसून आलेला नसून ५ दिवसात फक्त २ अर्ज आलेले आहेत. निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध होऊन आज ५ दिवस उलटले आहेत.



शहरांमध्ये राजकीय चर्चांना मात्र उधाण आले असून युती-आघाडीबाबत विविध चर्चा रंग घेत आहेत. पक्ष, गट आणि स्वतंत्र उमेदवारांमध्ये संभाव्य उमेदवारीसाठी हालचाली सुरू असल्या तरी त्याचे रूपांतर अद्याप अधिकृत अर्जात झालेले नाही. येत्या दोन दिवसांत उमेदवारांकडून फार्म भरण्यास गती येईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, अनेक ठिकाणी संभाव्य उमेदवारांनी कार्यकर्त्यांशी बैठक, चर्चा आणि संपर्क मोहिमेला प्रारंभ केला आहे. पुढील दोन दिवसांत अर्ज दाखल प्रक्रियेला गती मिळणार आहे.

# माहेरवरून पैसे आणण्यासाठी विवाहितेचा छळ

## पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**खामगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलेट मोटारसायकल घ्यायची आणि तिची किंमत मात्र सूनबाईच्या माहेराने भरायची! या अवाजवी मागणीसाठी विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कोमल सागर पाटील (२७) यांच्या तक्रारीवरून पतीसह पाच जणांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टिळक मैदान भागात राहणाऱ्या कोमल पाटील यांनी १३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांचे पती सागर नंदकुमार पाटील (३२), सासरे नंदकुमार श्रीराम पाटील (५२), सासू देवकी नंदकुमार पाटील (४७) (सर्व रा. जळगाव खान्देश), तसेच नणंद प्रिया शरद पारस्कर (२८) आणि नंदोई शरद माणिकराव पारस्कर (३३) यांनी मिळून बुलेट घेण्यासाठी माहेरवरून पैसे आणा असा सातत्याने तगादा लावला.१५ जून २०१९ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान एम.जे. कॉलेज रोड, क्राऊन बेकरीच्या मागे, जळगाव खान्देश येथील सासरी राहत असताना तक्रारदाराला सतत त्रास देण्यात आल्याचे नमूद आहे.

आरोपींनी संगनमत करून शिवीगाळ, धमक्या, फारकती घेण्याचा दबाव अशा विविध प्रकारे मानसिक व शारीरिक छळ केला.तक्रारीनुसार, तिच्या नकारानंतर पतीने दुसरे लग्न करण्याच्या धमक्या देत परिस्थिती गंभीर केली. या सर्व प्रकारामुळे विवाहितेने पोलिसांकडे धाव घेतली.कोमल पाटील यांच्या फिर्यादीवरून सहाही आरोपींवर शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पीएसआय दिपक इलामे करीत आहेत.विवाहितेच्या छळाच्या वाढत्या घटनांत हा प्रकार आणखी एक गंभीर उदाहरण ठरत असून, घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

# गारठा वाढला; दिवसाच्या तापमानात घट

**खामगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** पावसाने विश्रांती घेतली अन हुडहुडी वाढली आहे. दिवसाच्या तापमानात घट झाली असून खामगाव शहराचे तापमान ३ ते ४ अंशांनी घटले असून आगामी काही दिवसांत थंडीचा जोर आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यातील उष्णतेची झळ अनुभवलेल्या नागरिकांना अलिकडे अवकाळी पावसाने थोडासा दिलासा दिला होता. मात्र, आता हवामानात अचानक बदल झाला असून नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यातच हिवाळ्याची चाहूल स्पष्टपणे जाणवू लागली आहे. काही दिवसांपासून तापमानात सतत घट होत असून खामगाव शहराचे तापमान ३ ते ४ अंशांनी घटले असून या घटनेमुळे जिल्हाभर थंडीचा प्रभाव जाणवू लागला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, ९ नोव्हेंबरपासूनच पाऱ्यात घसरण सुरू झाली होती.

# निवडणूक शांततेत पार पडलीच पाहिजे; आचारसंहितेचे काटेकोर पालन करा : उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** आचारसंहिता म्हणजे फक्त नियमांची यादी नाही, तर पारदर्शक लोकशाहीची हमी आहे. नागरिकांनीही निवडणूक प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवून ही लोकशाही अधिक बळकट करावी, असे स्पष्ट प्रतिपादन उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांनी केले.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक२०२५ च्या पार्श्वभूमीवर लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेनिमित्त सर्व विभाग प्रमुख व निवडणूक पथकांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी विविध अनुषंगिक कार्यवाहीची सविस्तर चर्चा झाली.बैठकीला नगरपरिषद मुख्याधिकारी प्रशांत शेळके, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, उपजिल्हाधिकारी कल्पेश तायडे, उपविभागीय कृषी अधिकारी बी. जी. व्यवहारे आदी अधिकारी उपस्थित होते.

**लोकप्रतिनिधींची नावे-छायाचित्रे तातडीने हटवा**

आचारसंहितेच्या पहिल्या टप्प्यात शासकीय कार्यालये, इमारती, होर्डिंग्ज यांवर लावलेली लोकप्रतिनिधींची छायाचित्रे, संदेश, झेंडे, पताका तातडीने हटवावेत, अशा सूचनाही डॉ. पुरी यांनी दिल्या.सुरु असलेली व पूर्ण झालेली शासकीय कामांची नोंद त्वरित सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**वाहन व्यवस्थेवर विशेष लक्ष**

निवडणूक कालावधीत शासकीय वाहनांचा दुरुपयोग होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी स्वतंत्र नोंदी ठेवाव्यात. आवश्यक त्या वाहनांची व्यवस्था वेळेत करण्यात यावी.

**भरारी पथके तात्काळ सक्रिय**

निवडणुकीदरम्यान कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी एसएसटी, एफएसटी यांसह सर्व भरारी पथकांनी तातडीने कार्यरत राहावे, येणाऱ्या तक्रारींवर त्वरित कारवाई व्हावी, असे आदेश देण्यात आले.राज्य उत्पादन शुल्क विभागाने मद्यबंदी व नियमभंगावर चोख कारवाई करावी, असेही निर्देश देण्यात आले.

# प्रयोगशाळेचे कुलूप फोडून चोरी; साडे बाविस हजार रुपयांचे साहित्य लंपास

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शाळेच्या प्रयोगशाळेवर चोरट्यांची नजर! जिल्हा परिषद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या भौतिक शास्त्र प्रयोगशाळेचे कुलूप तोडून चोरट्यांनी लाखो रुपयांचे शैक्षणिक साहित्य लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

२२,५०० रुपयांचे साहित्य चोरले असून तीन आलमारींची तोडफोड करून आणखी २० हजारांचे नुकसान करण्यात आले आहे. शहरातील जिल्हा परिषद व जिल्हा न्यायालयाच्या शेजारी असलेल्या या विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा आहे. ६ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास प्राचार्य विष्णू भीमराव तायडे (५०) आणि संपूर्ण स्टाफ घरी निघून गेला. दुसऱ्या दिवशी ७ नोव्हेंबरला सकाळी साडेदहाच्या सुमारास कर्मचारी शाळेत पोहोचले असता, प्रयोगशाळेचे कुलूप तुटलेले दिसले. शिक्षक चारूदत्त नेरकर यांनी आत जाऊन पाहणी केली असता, खालील साहित्य चोरीस गेल्याचे आढळले. १० विद्युत घटक, ६ सूक्ष्मदर्शक, ४ लोखंडी स्टँड, १ सिलिंग फॅन, २ प्रयोग साहित्य पेट्या, २ सोनोमीटर, २ वायर कंडक्टर एकूण अंदाजे २२,५०० रुपयांचे साहित्य चोरट्यांनी पळवले. तसेच ३ आलमारींची तोडफोड करून आणखी २० हजारांचे नुकसान झाले. या प्रकरणी प्राचार्य तायडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून, चोरीमागील टोळीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. शैक्षणिक संस्थेवर असा प्रकार घडल्याने परिसरातही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वेगाने गाडी चालविणाऱ्यांना लागणार लगाम !

## जिल्हा पोलिस दलात ४ डी रडारचे ३ इंटरसेप्टर वाहने दाखल



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा जिल्हा पोलीस दलास पोलीस महासंचालक, महाराट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडुन अत्याधुनिक ४ डी रडार असलेले ३ इंटरसेप्टर वाहने प्राप्त झाले आहेत. आज रोजी निलेश तांबे, पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांच्या हस्ते १ वाहन जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा व २ वाहने महामार्ग पोलीस केंन्द्र, मलकापुर यांना वितरीत करण्यात आले आहेत. सबंधितांना निलेश तांबे, पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांनी कारवाई संबंधाने मार्गदर्शन केले. या वेळी अमोल गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक बुलडाणा हे देखील उपस्थीत होते. अतिवेगाने वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर ४ डी रडार इंटर सेप्टर वाहनाव्दारे दंडात्मक कारवाई केल्यास वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. यामुळे रस्ते अपघात कमी होउन जिवीत व वित्त हानी टाळता येणार आहे. प्राप्त इंटरसेप्टर वाहनाव्दारे जिल्हयांतर्गत समृध्दी महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व जिल्हा मार्गावर अत्तिवेगाने वाहन चालविणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या इंटरसेप्टर वाहनांमध्ये स्पीड गन व्यतीरिक्त ब्रेथ ॲनालायहार तसेच टींट मीटर देखील उपलबध असुन त्या दवारे मद्यपान करुन वाहन चाल–वणारे चालक तसेच काचेवर BLCK FILM असलेल्या वाहनांवर देखील कारवाई करता येणार आहे. सर्व वाहन चालकांना याव्दारे आवाहन करण्यात येते की, आपली वाहने रस्त्यावर ठिकठिकाणी दिलेल्या वेगमर्यादेतच वाहने चालवावी तसेच वाहतुकीच्या इतर सर्व नियमांचे पालन करावे. जे वाहन धारक रस्त्यावर दिलेल्या वेगमर्यादेचे उल्लंघन करतील त्यांच्यावर ४ डी रडार इंटर सेप्टर वाहनाव्दारे दंडात्मक करावाई करण्यात येईल.

# तामगावच्या अपहरण प्रकरणातील संशयित युवक ताब्यात

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** तामगाव पोलिस स्टेशनमध्ये २०२२ मध्ये दाखल झालेल्या अपहरण प्रकरणाचा धागा बुलढाणा पोलीसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने अखेर पकडला आहे. तीन वर्षापासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन मुलीचा आणि तिला पळवून नेणाऱ्या संशयिताचा शोध मध्य प्रदेशातील प्रितमपूर (जि. इंदूर) येथे लावण्यात आला. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अपहरण प्रकरणांच्या तपासात पोलिस दलाने मिळवलेले हे महत्त्वाचे यश मानले जात आहे. पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व अपहरण प्रकरणांचा सखोल तपास करून पीडित मुले आणि आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखा आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांनी विशेष पथकाला शोधमोहीम राबवण्याचे निर्देश दिले. तामगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अल्पवयीन मुलीचे अपहरण प्रकरण हाताळण्यात आले. त्यामध्ये पीडित मुलगी आणि संशयित विक्की प्रकाश गव्हांदे (वय २६, रा. वकाना, ता. संग्रामपूर) हे इंदूर जिल्ह्यात लपल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार ११ नोव्हेंबर २०२५ रोजी तांत्रिक विश्लेषण विभागाच्या मदतीने प्रितमपूर परिसरात शोधमोहीम हाती घेण्यात आली. काही तासांच्या सततच्या शोधानंतर पथकाने अल्पवयीन मुलगी आणि आरोपी विक्की गव्हांदे यांना शोधून ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीनंतर दोघांना सुरक्षितपणे तामगाव पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील तपास तामगाव पोलिस करत आहेत. या प्रकरणाच्या उलगड्यानंतर आता अन्य काही प्रकरणेही पोलिसांच्या रडारवर असून त्याचाही उलगडा होण्याची शक्यता आहे.

ही कारवाई एसपी निलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक डॉ. श्रेणिक लोढा (खामगाव), अमोल गायकवाड (बुलढाणा) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ऑपरेशनचे नेतृत्व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील आणि प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांनी केले. पथकात पोलिस उपनिरीक्षक संजय ठाकरे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मनोहर बोरसे, अविनाश जाधव, महिला पोलिस हेडकॉन्स्टेबल निर्मला कंकाळ, चालक सचिन शेंद्रे, तसेच राजू आडवे सहभागी झाले होते.

# बुलढाण्याचा कुणाल गांधी याचा 'बॉडीबिल्डिंग' मध्ये उत्तराखंडमध्ये डंका





**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** उत्तराखंड येथे नुकत्याच पार पडलेल्या शेरू क्लासिक एनपीसी रीजनल्स २०२५ नॉर्थ इंडिया चॅम्पियनशिप मध्ये महाराष्ट्रातील बुलढाणा येथील कुणाल गांधी यांनी चमकदार कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. कुणाल यांनी ७५ किलोपेक्षा जास्त वजन गटातील ज्युनियर बॉडीबिल्डिंग कॅटेगरीत सुवर्णपदक मिळवले, तसेच मेंस फिजीक कॅटेगरीत देखील अव्वल ठरून आणखी एक गोल्ड मेडल आपल्या नावे केले. एवढेच नव्हे, तर दोन्ही विभागांतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्यांनी ओव्हरऑल टायटल पटकावून स्पर्धेचा मानाचा मुकुट आपल्या डोक्यावर ठेवला. स्पर्धेत देशभरातील अव्वल दर्जाचे खेळाडू सहभागी झाले होते, मात्र कुणाल गांधी यांच्या प्रखर मेहनती, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि प्रभावी सादरीकरणामुळे त्यांनी निर्णायकांची मने जिंकली. स्थानिक आणि फिटनेस क्षेत्रातील तज्ज्ञांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, आगामी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्येही कुणाल मोठी कामगिरी करतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालयात 'संत स्वराज्य संविधानाचा' जागर

## संत विचाराची परंपरा लोकांपर्यंत पोहचवण्याचे तुषार हंसदास यांचे आवाहन



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** छत्रपती शिवाजी महाराजांनी वारकरी संतांचा विचार आणि झेंडा घेऊन राज्यकारभार केला. याच विचारांवर चालत महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराजांनी समाजाच्या उत्थानासाठी कार्य केले. हाच विचारांचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणीतून भारतीय संविधानात आला. आपले संविधान आणि आपला देश समजून घ्यायचा असेल तर आपली संत विचारांची परंपरा आपल्याला समजून घ्यावी लागेल आणि ती लोकांपर्यंत पोहोचवावी लागेल, असे आवाहन इंजि.तुषार रुईसा हंसदास यांनी केले. बुधवार १२ नोव्हेंबर रोजी महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालय बुलढाणा येथे 'संत स्वराज्य संविधान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी तुषार हंसदास बोलत होते. विचारपीठावर सामाजिक कार्यकर्त्या शाहीनाताई पठाण, संविधान सैनिक सुमेध जाधव, प्राचार्य डॉ. अविनाश गेडाम, प्रा.डॉ. हरिश साखरे, प्रा. डॉ. अस्मिता ठोंबरे, प्रा. अर्जुन बोकाडे, प्रा. संदिप मोठे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना तुषार रुईसा हंसदास म्हणाले की, देशात प्रचंड विविधता असूनही भारत एकसंध आणि एकत्र राहिला आहे. कारण संविधानाने विविधतेचा सन्मान केला आहे. व्यक्ती कोणताही धर्म, जात, लिंग, प्रांत, भाषा, गरीब वा श्रीमंत असो, प्रत्येक भारतीयाचा भारतावर आणि संविधानावर समान हक्क आहे. एकंदरीत संविधानाने प्रत्येक भारतीयाला सामावून घेतल्याचेही त्यांनी सांगितले. संविधान सैनिक सुमेध जाधव यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, गणराज्य, न्याय, स्वातंत्र्य, समानता यावर मार्गदर्शन केले. दरम्यान खेळ मांडीयेला वाळवंटी घाई, नाचती वैष्णव भाई रे.. आम्ही प्रकाश बीजे रुजवित चाललो.. यांसारखी गीते सादर करुन तुषार हंसदास व सुमेध जाधव यांनी प्रबोधनात्मक विचार मांडले. तर गोपाल घेवंदे यांनी संविधानाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाहिनाताई पठाण, स्वागत गीत रागिनी तापडीया, सूत्रसंचालन राम हिंगे तर आभार छाया भाग्यवंत यांनी मानले.

### विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये आत्मसात करा : डॉ.गेडाम

संविधानाची पायमल्ली रोखणे, संविधानाचं संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. संविधानाचे पालन करणे हीच खरी देशभक्ती असून विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये आत्मसात करावी, असे आवाहन महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश गेडाम यांनी केले. संविधान सर्वांचे आहे, हे प्रत्येकाला सांगूया.. संविधानाचा विचार घराघरात पोचवूया.. यासाठी आगामी काळात महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करणार असल्याचेही त्यांनी सांगितले

# कारची ऑटोला धडक जनुना येथील तरुणी जखमी

**शेगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** लग्न सोहळ्यात किरकोळ कारणावरून वाद होऊन दोघा भावांना मारहाण केल्याची घटना ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता अकोट रोडवरील लालबाबा देवी मंदिरासमोर घडली. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी अकोला जिल्ह्यातील म्हैसांग येथील एका युवकावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत संतोष दादाराव आगलावे (वय २१), रा. मासा (सिसा), ता. जि. अकोला यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते नातेवाईकांच्या लग्नात उपस्थित असताना आरोपी आनंद चव्हाण (रा. म्हैसांग, ता. जि. अकोला) याने त्यांना धक्का दिला. त्यावर संतोष यांनी विरोध व्यक्त केला असता, आरोपीने शिवीगाळ करून हातातील स्टीलच्या कड्याने संतोष यांच्या उजव्या डोळ्याजवळ, नाकावर आणि गालावर वार केले. दरम्यान, भांडण थांबविण्यासाठी संतोष यांचा चुलत भाऊ महादेव नामदेव आगलावे पुढे आला असता, त्यालाही आरोपीने छाती, बरगड्या आणि डोक्यावर कड्याने मारहाण केली. तसेच दोघांना जिवे मारण्याची धमकी दिली.

# व्यंकटगिरीवर ब्रह्मोत्सव २४ ते २७ नोव्हेंबर रोजी होणार साजरा

**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** राजुर घाटातील व्यंकटगिरी पर्वतावर निसर्गरम्य वातावरणात श्री बालाजी मंदिरात दरव–र्षीप्रमाणे यंदाही ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २४ नोव्हेंबर पासून या ब्रह्मोत्सव उत्सवाची सुरुवात होणार असून २७ नोव्हेंबर रोजी सांगता होणार आहे. बालाजी सेवा समिती आणि बालाजी मंदिर संस्थांच्या वतीने या ब्रह्मोत्सवाची जय्यत तयारी केली जात असुन. चार दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच भजन संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बालाजी सेवा समिती आणि बालाजी मंदिर संस्थांच्या वतीने व्यंकटगिरी पर्वतावरील बालाजी मंदिरात दरवर्षी ब्रह्मोत्सव हा मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. ब्रह्मोत्सवाचे यंदा पंधरावे वर्ष आहे. २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी विधिवत पूजा आणि होम हवन करून ब्रह्मोत्सवाची सुरुवात होणार आहे. २५ व २६ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत भजन संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ते १ या वेळेत ह.भ.प.तेजस्विनी दीदी पाठक यांचे काल्याचे कीर्तन आयोजित केलेले असुन समस्त भाविक भक्त, बालाजी भक्त यांना आग्रहाची विनंती वरील ब्रह्मोत्सवाच्या संपूर्ण कार्यक्रमास उपस्थित राहून श्री बालाजींचा कृपाशीर्वाद प्राप्त करावा असे आवाहन श्री बालाजी सेवा समिती तथा श्री बालाजी भक्त परिवार यांच्याकडून करण्यात आले आहे.

# खराब रस्त्यांमुळे एसटी बस बंद

**डोणगाव, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शेलगाव देशमुख–कनका– बेलगाव–डोणगाव या मार्गावर दररोज विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात ये–जा होत असते. मात्र, शेलगाव देशमुख रस्त्यावरील खोल खड्ड्यांमुळे बुधवारी परत येणारी एसटी बस समृद्धी महामार्गाच्या पुलाजवळच बंद पडली. त्याच बसला बेल–गावकडील विद्यार्थ्यांना घेण्यासाठी डोणगाव बसस्थानकात परत यायचे होते. बस वेळेवर न आल्याने विद्यार्थी तब्बल दोन तास बसस्थानकावर उभे राहून प्रतीक्षा करत राहिले. शेलगाव देशमुख–कनका मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी आहे. पालकांच्या मते, या खराब रस्त्यावर वारंवार बस बंद पडत असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय तर होतेच, परंतु बस बिघडल्यास चालकावर एसटी महामंडळाकडून दंडात्मक कारवाई केली जाते. त्यामुळे रस्ता दुरुस्त नसताना चालकांना जबाबदार धरणे अन्यायकारक असल्याचे पालकांचे मत आहे.

# बाल शिवाजी कॉन्व्हेन्ट मध्ये विद्यार्थी दिन व वंदे मातरम उत्साहात





**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** बाल शिवाजी कॉन्व्हेन्टमध्ये ७ नोव्हेंबर रोजी विद्यार्थी दिन वंदे मातरम गीतांचा १५० वा वर्धापन दिन संयुक्तपणे मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्य निशा पाटील मॅडम होत्या तर प्रमुख अतिथी शाळेच्या पर्यवेक्षिका वृषाली जोशी मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाची सुरुवातीला भारतीय संविधानाचे प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले. नंतर वंदे मातरम गीताचा वर्धापन दिनानिमित्त वंदे मातरम गीत म्हणण्यात आले. ७ नोव्हेंबर म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्यांना 'ज्ञानाचे प्रतिक' म्हणून ओळखले जाते त्यांचा शाळेचा पहिला दिवस आहे. तो दिवस सर्वत्र विद्यार्थी दिन म्हणून साजरा करत असतो. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन`अस्मिता खंडेराव मॅडम यांनी केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्यार्थी जीवनातील काही प्रसंग सांगून शाळेतील विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. तसेच चेतना वानरे मॅडम यांनी विद्यार्थी दिन कधीपासून चालू झाला? कोणी सुरू केला ? व या दिवशी विद्यार्थ्यांनी काय केले पाहिजे या सर्वांविषयी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष निशा पाटील मॅडम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी माहिती देताना विद्यार्थ्यांनी सुद्धा त्यांच अनुकरण करावे असे सांगितले. या कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने झाला. यावेळी कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकशिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# फवारणी कीटचे महत्त्व सांगतांना कृषिकन्या



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** कोलवड येथे फवारणी करताना फवारणी कीटचे महत्व सांगतांना कृषिकन्यानी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्न असलेल्या डॉ राजेंद्र गोहे कृषि महाविद्यालयातील कृषिकन्यांनी ग्रामीन कृषि कार्याअनुभव उपक्रमाअंतर्गत कोलवड येथील शेतकऱ्यांना कीटचा वापर करून आपले व आपल्या परिवाराचे जीवन कसे विषमुक्त व रोगी ठेवता येईल, तसेच औषधांचे हात न धुता काही खाण्यांच्या वस्तूंना हात लावल्यास व तसेच खाल्ल्यास त्यांचा आपल्या शरीरावर काय परिणाम होईल याची माहिती कृषिकन्यांनी शेतकऱ्यांना दिली. समीक्षा देशमुख, संजीवनी हिवलेकर, पायल घट्टे, वैष्णवी गायकवाड, राजश्री डुरे यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन करण्यासाठी काही तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन लाभले. कोलवड येथील शेतकऱ्यांना फवारणी कीटचे महत्व हे कृषिकन्यांनी पटवून दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश वाघ सर व कार्यक्रम समन्वयक प्रा.शुभम सराफ सर तसेच प्रा.हिवरे सर यांचे ही मार्गदर्शन लाभले.

## कृषीमाल खरेदी-विक्रीसह कामकाज व व्यवस्थापनाची कृषीकन्यांनी घेतली माहिती



**बुलढाणा, १४ नोव्हेंबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** कृषीप्रधान भारत देशात कृषी व्यवस्था सांभाळण्यात महिलाच अग्रेसर असतात, कृषीविषयक शिक्षणासाठी मुलींचा सहभागही आता कमालीचा वाढला आहे. एग्रीकल्चर एज्युकेशन मध्ये गुणवत्तेत मुलीच अग्रेसर दिसत आहे. बुलढाणा येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्न डॉ. राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयात शिकत असलेल्या मुली कृषीविषयक कार्यामध्ये सदैव अग्रेसर असतात. शेतकऱ्यांची ही लूट थांबविण्यासाठीच सहकार व पणन कायद्याअंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती यांची स्थापना झाली. या बाजार समितीचे कामकाज कसे चालते ? याची प्रात्यक्षिकासह माहिती घेण्यासाठी गोडे कृषी महाविद्यालयातील समीक्षा देशमुख, संजीवनी हिवलेकर, पायल घट्टे, वैष्णवी गायकवाड, राजश्री डुरे आदी कृषीकन्यांनी बुलढाणा कृषी उत्पन्न बाजार समितीला १० ऑक्टोबर रोजी भेट देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष जालिंदर बुधवत, सचिव बनिता साबळे यांनी या कृषीकन्यांना कामांविषयी शैक्षणिकदृष्ट्या माहिती दिली. यासाठी या कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश वाघ, कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम सराफ, प्रा. रवी शेळके, प्रा.नितीन राठोड यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689